# नगर अर्बन को-ऑप.बँक लि., अहमदनगर.

(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
पोस्ट बॉक्स नं. ७, बँक रोड, अहमदनगर -४१४ ००१
टेलिफोन नं. ०२४१-२४१७८००, २३४३५४१, २३४३६४२

# विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांकरीता)

नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. अहमदनगर. (मल्टी-स्टेट शेडयुल्ड बँक) च्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक १५ एप्रिल २०२३ रोजी दुपारी ठिक ०१.०० वाजता लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळक रोड, अहमदनगर ४१४ ००१ येथे होणार आहे.** त्यावेळी मा.केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली यांचे दिनांक २८ मार्च २०२३ चे आदेशाप्रमाणे बँकेच्या सन २०१४ ते २०१९ या सालातील तत्कालीन संचालकांसंदर्भी कारवाईचे अनुषंगाने कामकाज होईल. तरी सदर सभेस आपण अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

## सभेपुढील विषय

१. कायदा कलम ३० अन्वये संबंधीतांचे सभासदत्व निष्कासन व परिणामी कलम ४३ (१) अन्वये संचालक मंडळ सदस्य म्हणून अपात्र ठरविणे.

२. कायदा कलम ४७ अन्वये सन २०२१ ते २०२६ सालासाठी संबंधित निर्वाचित संचालक मंडळ सदस्यांचे निष्कासन करणे.

**ठिकाण** : अहमदनगर (महाराष्ट्र )
**दिनांक** : ०६ एप्रिल २०२३

मा.संचालक मंडळाचे अनुज्ञेने
**एम.पी.साळवे**
प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी

**सूचना :**

१. वरील सभेस दुपारी ०१.०० वाजता प्रारंभ होईल. त्यासाठी आवश्यक ती गणसंख्या पूर्ण झाली नसेल तर ही सभा स्थगित केली जाईल. अशा स्थगित सभेचे कामकाज त्याच दिवशी, त्याच ठिकाणी दुपारी १.३० वाजता सुरु होईल व या स्थगित सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही. या सभेत वरील नोटीशीमध्ये नमूद केलेल्या विषयांचा विचार करण्यात येईल.

२. अत्याधुनिक तंत्रज्ञानास अनुसरुन बँकेच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या नोटीसीच्या उपविधी क्रमांक २९(ग) अन्वये बँकेच्या प्रधानकार्यालयासह सर्व शाखा कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर तसेच बँकेच्या www.nucb.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेत आले आहे व बँकेकडे उपलब्ध असलेल्या पात्र सभासदांच्या ई-मेल व नोंदणीकृत मोबाईल नंबर पाठविणेत आलेली आहे. कृपया अवलोकन करावे.

३. शनिवार दिनांक १५ एप्रिल २०२३ रोजी होणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधीची कागदपत्रे बँकेच्या प्रधानकार्यालयात दिनांक १० एप्रिल २०२३ ते १३ एप्रिल २०२३ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत पहावयास मिळतील.

४. विशेष सर्वसाधारण सभेपुढील विषयाबाबत सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास ते लेखी स्वरुपात बँकेच्या प्रधान कार्यालयात दिनांक १० एप्रिल २०२३ ते १३ एप्रिल २०२३ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत आणून दयावेत, ही विनंती.

५. नोटीसीमधील विषयांच्या अनुषंगाने उपस्थित सभासदांमध्ये मतदान आयोजित करण्यात येणार असल्यामुळे बँकेच्या पोटनियमाप्रमाणे मतदान करण्यास पात्र असलेल्या सभासदांनाच सभास्थानी प्रवेश देण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

६. कृपया सभेस येताना ओळखपत्र जरुर सोबत आणावे.